ये.का.मु.-४०,००० पु. (२५ x ६)-०८-२०१०-ए ३-वि (वाय) ३५६

FORM - 1A

N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1 राज्य महाराष्ट्र जिल्हा मुंबई पोलीस ठाणे ला.प्र.वि. मुंबई पहिली खबर क्र. 21/18 वर्ष 2018 दिनांक 30/05/18
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधि. १९८८ कलमे Sections 7, 12
(ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार ........ तारीख पासून 06/11/17 वेळ ........ तारीख पर्यंत 20/11/17 वेळ ........
Occurence of offence : Day Date from Time वेळोवेळी Date to Time

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी अशी खूण करा. Tick applicable portion)

3. (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळालेची तारीख 30/05/2018 वेळ 16:00 वा.
Information received at P. S. Date Time

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 25/18 तारीख 30/05/2018 वेळ 16:00 वा.
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of information : लेखी ✓ / तोंडी Written / Oral ........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........ चौकी/बीट/दूरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव वस्तू व सेवाकर कार्यालय, माझगाव, मुंबई रस्त्याचे नाव
Address of Occurence Name No. if any Ward Name of road

जवळचे ओळख चिन्ह/ठिकाण ........ गाव ........ पोस्ट ........ तालुका ........ जिल्हा ........ राज्य ........
Nearest Adentifiable Place Village Post Taluka Dist. State

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ........ तालुका ........ जिल्हा ........ राज्य ........
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant/Informant : Permanent Address

(a) नाव Name ज्ञानेश्वर आवारी (b) वडिलाचे / पतीचे नाव पंढरीनाथ आवारी
Father's / Husbands Name

(c) जन्मतारीख व वय 02/02/1970 (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. —
Date of Birth & Age Nationality Phone No.

(e) पारपत्र क्रमांक — दिल्याचा दिनांक — दिल्याचे ठिकाण ........ (f) व्यवसाय नोकरी
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation

(g) धर्म Religion जात Caste जनजात Sub-Caste

(h) पत्ता : गल्ली/सर्व्हे नं. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई 400030
Address : Ward House/Name No. Phone/M. No. Pan No. Card No.

रस्त्याचे नाव ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण ........ गाव ........ पोस्ट ........ पो.स्टे ........
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.

तालुका ........ जिल्हा ........ राज्य ........ सध्याचा पत्ता ........
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म I B वर वेगळ्या सिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व स. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे).
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary) (If suspect particular of physical feature write on Form I-B of attach FIR I-B to case diary).

1) गोपाल रामभाऊ सूर्यवंशी, सहाय्यक राज्यकर आयुक्त, रा.ठी. A-601, रॉयलवुड हाईट्स, सेक्टर-3, खारघर, नवी मुंबई.

2) डी. व्ही. रहेरकर, माजी विक्रीकर उप-आयुक्त व सिव्हिल पेंशनर, रा.ठी. 105, तारा निवास, वाडी प्रभु देशपांडे रोड, घंटाळी, ठाणे (प).

फिर्याद

दिनांक —३०/०५/२०१८

ज्ञानेश्वर पंढरीनाथ आवारी, सहाय्यक पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, सर पोचखनवाला रोड, वरळी, मुंबई– ४०००३०.

मी, सहाय्यक पोलीस आयुक्त म्हणून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, वरळी, मुंबई येथे (एक टप्पा पदोन्नतीवर–मुळ पद पोलीस निरीक्षक) नेमणूकीस आहे. दिनांक ०६/०४/२०१८ रोजी च्या मा. अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग यांचेकडील आदेशाप्रमाणे मा. अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, मुंबई यांनी प्रकरण क्र डी/३१/२०१८ मध्ये चौकशी करण्यासाठी आमची नेमणूक केली होती. त्या अनुषंगाने नमूद प्रकरणामध्ये आम्ही वरिष्ठांच्या पुर्वपरवानगीने चौकशी केली आहे.

सदरचे प्रकरण राज्यकर आयुक्त, वस्तू व सेवाकर विभाग, महाराष्ट्र राज्य, माझगांव, मुंबई यांचेकडून क्र स्वी.स./अन्वे–अ/२०१७–२०१८/मे. मॅक्नेली भारत इंजीनिअरिंग/ब–३१२ मुंबई दिनांक ३१/०३/२०१८ प्रमाणे मा. महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयास प्राप्त झाले होते. नमूद प्रकरणाची हकीकत खालील प्रमाणे–

श्री हिमाद्री शेखर चक्रवर्ती, व्हाईस प्रेसीडेन्ट, मॅक्नेली भारत इंजीनिअरिंग कंपनी लीमी, पत्ता ५ २/बी, इको स्पेस कॅम्पस, न्यु टाऊन, राजरहट, कोलकत्ता–१५६ यांनी दिनांक २१/११/२०१७ रोजी श्रीमती ए. शैला, राज्यकर सह आयुक्त, अन्वेषण बी, वस्तु व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई यांचेकडे सोपन सुर्यवंशी, सहाय्यक राज्यकर आयुक्त, यांच्या विरुध्द तोंडी तक्रार केली होती. नमूद तक्रारीच्या अनुषंगाने श्री नितिन शालीग्राम, राज्यकर उप आयुक्त, वस्तु व सेवाकर विभाग यांनी प्राथमिक चौकशी केली. तसेच सोपान रामभाउ सुर्यवंशी, सहाय्यक राज्यकर आयुक्त, (ड ००५) अन्वेषण अ, मुंबई यांचा जबाब नोंद केला आहे. नमूद जबाबामध्ये सोपान सुर्यवंशी सहायक राज्यकर आयुक्त, (पुर्वीचे पद सहायक विक्रीकर आयुक्त) राहणार, ए–६०१, रोझवुड हाईटस्, सेक्टर–३, खारघर, नवी मुंबई यांनी, मॅक्नेली भारत इंजीनिअरिंग कंपनी लीमी चे व्हाईस प्रेसीडेंट, श्री चक्रवर्ती, यांना डी.व्ही. रेठरेकर, माजी विक्रीकर उप आयुक्त व लिगल प्रॅक्टिशनर राहणार.१०५, तारा निवास, बाजी प्रभु देशपांडे रोड, घंटाली, तीन पेट्रोल पंपाजवळ, गणपती कारखान्या जवळ, ठाणे पश्चिम ४००६०२ यांच्या फोनवरुन फोन केल्याचे लेखी मान्य केले. तसेच नमूद फोन श्री रेठरेकर यांना हस्तांतरीत केला असता रेठरेकर यांनी चक्रवर्ती यांच्याकडे रुपये २.०० कोटीची मागणी केली. तसेच दिनांक ०६/११/२०१७ रोजी त्यांच्या मोबाईल वरुन चक्रवर्ती यांना **" your attendance is required to record the statement and also bring full name address and email ID of all the directors."** असा टेक्स्ट मॅसेज (एसएमएस) पाठविला असल्याचे सुर्यवंशी यांनी मान्य केले. नमूद जबाबावर श्रीमती ए. शैला व नितीन शालीग्राम यांनी समक्ष म्हणून स्वाक्षरी केली आहे.

त्यानंतर श्री नितीन शालीग्राम, राज्यकर उप आयुक्त, यांनी दिनांक २४/११/२०१७ रोजी सोपान सुर्यवंशी यांचा मोबाईल फोन– **IPhone S-6 IMEI No. 355409070704030** हा ताब्यात घेतला. दिनांक २८/११/२०१७ रोजी श्री नितीन शालीग्राम यांना श्री हिमाद्री शेखर चक्रवर्ती यांची तक्रार ईमेल व्दारे व त्यानंतर टपालाने प्राप्त झाली. नमूद तक्रारीमध्ये सुर्यवंशी व रेठरेकर फोनकरून अन्वेषण भेटीची कारवाई अदयाप बंद करण्यात आली नाही व त्या कार्यवाहीसाठी कंपनीचे संचालकांना नव्याने समन्स काढण्यात येईल अशी धमकी देत असल्याचे नमूद केले होते. त्या तक्रारी सोबत टेलीफोन संभाषणाच्या एकूण ५ ऑडीओ क्लीप प्राप्त झाल्या.

समक्ष

30/05/2018
(उमेश गाउ)
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि. मुंबई

30/5/18
ACP ACB
Mumbai

8 तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..... चौकशी अंती
Reasons for delay in reporting by the Complainant/informant

9. चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तार मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proform) write down details on blank back page.

रुपये दोन कोटी

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..... रुपये दोन कोटी
Total value of properties stolen and involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recover Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक .....
Unnatural/Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील को-या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख वेळी व ठिकाणी, यातील आरोपी क्र. 1 यांनी मुळ तक्रारदार यांच्या "मॅकेनिकल भारत ईंजि. कंपनी लिमीटेड" या कंपनीस माहे सप्टेंबर-ऑक्टोबर-2016 मध्ये दिलेल्या अन्वेषण भेटीच्या संबधाने, यांचे शासकीय पदाचे काम पार पाडत असताना, कंपनीवर अवकृपा दाखवण्यापासुन परावृत्त होण्यासाठी कायदेशीर परिश्रमीका स्विरोत, तक्रारदार चक्रवर्ती यांचेकडे, यातील आरोपी क्र. 2, यांचे मार्फत "रुपये दोन कोटि" लाचेची मागणी केली, व ती लाच प्राप्त करणेसाठी तक्रारदार चक्रवर्ती यांना वेळोवेळी फोन द्वारे संपर्क साधुन पाठपुरावा केला, म्हणुन कलम 7, 12, भ्र.प्र.अधि. 1988 अन्वये गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही .— 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करुन तपासावर घेतला. तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा ..... ज्ञानेश्वर आवारी, सहाय्यक पोलीस आयुक्त, ला.प्र.वि. मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण. .....

3. दुस-या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ..... जिल्हा ..... राज्य .....

*Action taken* .— Since the above information reveals Commission of offence (s) u/s. as mentioned at Item No. 2 :

(1) Registered case and took up the investigation or Directed (Name of I. O.) ..... Rank ..... No. ..... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ..... (3) Transferred to P. S. ..... District ..... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून/वाचून/ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यांस विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

30/05/2018

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer-Incharge, Police Station.

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant/Informant

संपूर्ण नाव Name उमेश [illegible]
पदनाम Rank पोलीस [illegible]
तपासिक अं. चा कोड क्र.
Posting
Coding No. of I. O. .....

15. १. न्यायालयास सादर केल्याची तारीख ग्रा.क्र. 6508/2018 दि. 30/05/2018
1. Date and time of submitted to the Court

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

(के) -Form 1-A

सदर प्रकरण पुढील चौकशी करीता श्री. के. के. सरंगल, अपर पोलीस महासंचालक आणि मुख्य दक्षता अधिकारी, राज्यकर विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे दिनांक ०८/११/२०१७ रोजी पाठविण्यात आले. त्यानंतर नमूद प्रकरणात श्री एस पी सरावणे, राज्यकर उप आयुक्त, दक्षता, यांनी चौकशी केली.

श्री एस.पी.सरावणे यांनी दिनांक ११/१२/२०१७ रोजी मॅक्नेली भारत इंजिनिअरिंग कपंनी लिमी चे श्री एच एस चक्रवर्ती व श्रीमती सोनाली सहापात्रा त्यांच्याकडून त्यांचे मोबाईल फोन ताब्यात घेतले. नमूद मोबाईल फोन मधील डाटा, श्री संदिप गादीया, फॉरेन्सीक एक्सपर्ट, यांची तांत्रीक मदत घेवून तपासण्यात आला. नमूद मोबाईल फोनमध्ये डी.व्ही. रेठरेकर व एच.एस. चक्रवर्ती यांच्या संभाषणाच्या ५ ऑडीओ फाईल्स तसेच सुर्यवंशी यांचा एस.एम.एस. व इतर डाटा श्री चक्रवर्ती यांच्या मोबाईल मध्ये असल्याचा अहवाल श्री संदीप गादीया यांनी दिला. नमूद दोन्ही मोबाईल फोन श्री. सरावणे यांनी रबरी सीलने सीलबंद करुन ताब्यात घेतले.

दिनांक ०६/०२/२०१८ रोजी मॅक्नेली भारत इंजिनिअरिंग कंपनी लीमी. या कंपनीचे श्री. एच.एस. चक्रवर्ती, व्हाईस प्रेसीडेंट, श्रीमती सोनाली सहापात्रा, सिनीयर मॅनेजर, इनडारेक्ट टॅक्सेस, श्री. विश्वजीत भट्टाचार्य, असोसिएट जनरल मॅनेजर, फायनान्स, यांचे सविस्तर जबाब दक्षता विभागात नोंदविण्यात आले. तसेच त्याच दिवशी श्री एच एस चक्रवर्ती यांच्या मदतीने श्री एच एस चक्रवर्ती व श्री रेठरेकर तसेच श्री सुर्यवंशी यांच्यामध्ये मोबाईल फोनवर झालेल्या संभाषणाच्या पांच ऑडीओ क्लीप संगणकावर ऐकून त्यामधील संभाषणाचे ट्रान्सक्रिप्ट तयार करण्यात आले. ट्रान्सक्रिप्ट तयार करताना श्री चक्रवर्ती यांनी बोलणाऱ्या व्यक्तींचा आवाज ओळखून सांगीतला व त्या ट्रान्सक्रिप्टवर स्वाक्षरी केली.

सदर प्रकरणात पुढील चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्याचा अभिप्राय मुख्य दक्षता अधिकारी, वस्तु व सेवाकर विभाग, यांनी दिल्याने सदरचे प्रकरण दिनांक ३१/०३/२०१८ रोजी मा. महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा., मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आले. नमुद प्रकरणात राज्यकर सह आयुक्त कार्यालयाकडून एकूण ७ नस्ती प्राप्त झाल्या असून त्यामध्ये सोपान सुर्यवंशी यांचा दिनां

क २२/११/२०१७ रोजी नोंदविलेला मुळ जबाब श्री हिमाद्री चक्रवर्ती यांची दिनांक २८/११/२०१७ रोजीची लेखी तक्रार व तसेच त्यांचे वेळोवेळी नोंदविलेले जबाब तसेच दिनांक ०६/०२/२०१८ रोजीचे ट्रान्सक्रिप्टच्या मुळ प्रती, श्री संदीप गादीया यांचा अहवाल व इतर संबधीत मुळ कागदपत्रे जोडण्यात आली.

तक्रारदार श्री. हिमाद्री चक्रवर्ती यांनी दिनांक २८/११/२०१७ रोजी दिलेली तक्रार व त्या सोबतच्या सी डी मधिल ५ ऑडीओ क्लीप्स आम्ही ऐकल्या. नमूद ऑडीओ क्लीपमधील संभाषण हे दिनांक ०६/०२/२०१८ रोजी श्री.हिमाद्री चकवती यांच्या मदतीने तयार केलेल्या ट्रान्सक्रिप्ट मधील संभाषणाशी तंतोतंत जुळणारे आहे.

नमुद प्रकरणात चौकशी दरम्यान आम्ही श्री नितीन शालीग्रम, राज्यकर उप आयुक्त, वस्तु व सेवाकर, माझगांव, मुंबई, श्री सातापा सरावणे, राज्यकर उप आयुक्त, दक्षता, व मुळ तक्रारदार हिमाद्री शेखर चक्रवर्ती वय ५५, धंदा नौकरी, राहणार ठिकाण:— एल—१/१ रिजंट ईस्टेट, कोलकाता ७०००९२ यांचा सविस्तर जबाब नोंद केला. आम्ही केलेल्या चौकशीतून तसेच उपलब्ध कागदोपत्री पुराव्यावरुन खालील प्रमाणे बाबी निष्पन्न झाल्या.

स्वमत,

30/05/2018

(उमेश गौड)
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि. गोंदिया

20/5/18
Addl. ACP, Mumbai

प्रमोद बच्छाव सहाय्यक विक्रीकर आयुक्त व सोपान सुर्यवंशी, सहाय्यक विक्रीकर आयुक्त, माझगांव, मुंबई यांनी मॅक्नेली भारत इंजिनिअरिंग कंपनी लि. या कपनीच्या नागपूर येथील साईट ऑफिस येथे माहे सप्टेंबर व ऑक्टोंबर २०१६ मध्ये अन्वेषण भेट दिली होती. त्यावेळी प्रमोद बच्छाव, हे मुख्य अन्वेषण अधिकारी होते. तसेच सोपान सुर्यवंशी, हे सहायक अन्वेषण अधिकारी होते. अन्वेषण भेटी वेळी अधिकारी यांच्या मागणी प्रमाणे कंपनीचे नागपूर कार्यालय प्रमुख श्री. श्यामसुदर पाल, यांनी त्यांना सर्व कागदपत्रे उपलब्ध करून दिली होती.

अन्वेषण भेटी दरम्यान मॅक्नेली भारत इंजिनिअरिंग प्रा लिमी. या कपनीचे वतीने १) गणेरीवाल, २) विश्वजित भट्टाचारी, सी ए., ३) सोमन चक्रवर्ती, साईट ऑफिस अकाउटंट, ४) श्रीमती सोनाली सहा पात्रा, सिनिअर मॅनेजर, इन्डायरेक्ट टॅक्स, ५) श्रीमती सनहिता भटटाचार्य, ६) डी.व्ही. रेठरेकर, लिगल प्रॅक्टिक्शनर, ७) एच.एस. चक्रवर्ती यांनी नागपूर ऑफिसमध्ये श्री प्रमोद बच्छाव व सोपान सुर्यवंशी यांची भेट घेतली होती.

सोपान सुर्यवंशी व प्रमोद बच्छाव यांनी मॅक्नेली भारत इंजिनिअरिंग कंपनी लि. चे सन २०११–२०१२ ते २०१५–२०१६ या वर्षाचे व्हॅल्यु ॲडेड टॅक्स रिटर्न मध्ये दोष काढून कपंनीस रू. ३ कोटी ५५ लाख चा अतिरिक्त टॅक्स लावण्यात आला. कंपनीचे नवनियुक्त लिगल पॅक्टिशनर श्री डी. व्ही रेठरेकर यांनी अतिरिक्त टॅक्स भरण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे कंपनीने अतिरिक्त टॅक्स भरला.

दिनांक ०६/११/२०१७ रोजी सोपान सुर्यवंशी यांनी त्यांच्या मोबाईल क्र. ०९८९२८९५१२६ वरून श्री चक्रवर्ती यांच्या मोबाईल क्रमांक ०९८३१९७०३८१ वर "your attendance is required to record the statement and also bring full name address and email ID of a ll the directors." असा टेक्स्ट मॅसेज (एसएमएस) पाठविला. त्याच दरम्यान सोपान सुर्यवंशी यांनी श्री एच.एस.चक्रवर्ती यांना फोनकरून त्यांचे कार्यालयात येण्यास सांगितले. त्यानंतर सोपान सुर्यवंशी यांनी दिनांक ०९/११/२०१७ ते २०/११/२०१७ दरम्यान श्री. चक्रवर्ती यांना डी.व्ही.रेठरेकर, यांच्या मोबाईल फोनवरून स्वत: तसेच डी.व्ही. रेठरेकर यांच्याकडून फोन कॉल करुन मॅक्नेली भारत इंजिनिअरिंग कंपनी लिमी. या कंपनीस माहे सप्टेंबर व ऑक्टोंबर २०१६ मध्ये दिलेल्या अन्वेषण भेटीच्या संबधाने, त्यांच्या शासकीय पदाचे काम पार पाडत असताना, कंपनीवर अवकृपा दाखविण्यापासून परावृत्त होण्यासाठी, कायदेशिर पारिश्रमीकाखेरीज, श्री.एच.एस.चक्रवती यांच्याकडे रुपये २.०० कोटी लाचेची मागणी केली आहे. अशाप्रकारे लाचेची रक्कम सोपान सुर्यवंशी यांना अदा न केल्यास, कंपनीच्या संचालकांना कार्यालयात बोलावून कारवाई केली जाईल, असा इशारा देण्यात आला म्हणून सोपान सुर्यवंशी यांनी कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा केल्याचे निष्पन्न होते.

तसेच डी व्ही रेठरेकर यांनी दिनांक ०९/११/२०१७ ते २०/११/२०१७ दरम्यान श्री. एच. एस.चक्रवर्ती यांच्या मोबाईल फोनवर कॉल करुन मॅक्नेली भारत इंजिनिअरिंग प्रा लिमी या कंपनीस माहे सप्टेंबर व ऑक्टोबर २०१६ मध्ये सोपान सुर्यवंशी यांनी दिलेल्या अन्वेषण भेटीच्या संबधाने, सोपान सुर्यवंशी यांनी त्यांच्या शासकीय पदाचे काम पार पाडत असताना कंपनीवर अवकृपा दाखविण्यापासून परावृत्त होण्यासाठी, कायदेशिर पारिश्रमीकाखेरीज, सोपान सुर्यवंशी यांच्याकरीता श्री एच एस चक्रवती यांच्याकडे रुपये २.०० कोटी लाचेची मागणी करुन ती लाचेची रक्कम प्राप्त करण्यासाठी, श्री एच.एस.चक्रवर्ती यांना वेळोवेळी फोन करुन पाठपुरावा करून सोपान सुर्यवंशी यांना

समक्ष,
३०/०५/२०१८
( उमेश गौड )
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि. मुंबई

३०/५/२०१८
ACP ACB Mumbai

लाच मागण्याकरीता सहाय्य केले म्हणून त्यांनी कलम १२ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा केल्याचे निष्पन्न होते.

आतापर्यंत केलेल्या एकंदर चौकशीमध्ये नोंदविण्यात आलेले जबाब, प्राप्त करण्यात आलेला कागदोपत्री पुरावा तसेच सोपान सुर्यवंशी, सहाय्यक राज्यकर आयुक्त, डी.व्ही. रेठरेकर, माजी विक्रीकर उप आयुक्त, यांचेत व हिमाद्री चक्रवर्ती यांचेतील फोनवरील संभाषणाच्या उपलब्ध ऑडीओ क्लीप तसेच श्री संदीप गादीया यांचा अहवाल यावरुन असे निष्पन्न झाले आहे की,

सोपान सुर्यवंशी यांनी दिनांक ०९/११/२०१७ ते २०/११/२०१७ दरम्यान श्री चक्रवर्ती यांना डी.व्ही.रेठरेकर, यांच्या मोबाईल फोनवरून स्वत: तसेच डी.व्ही. रेठरेकर यांच्याकडून फोन कॉल करुन श्री एच.एस. चक्रवर्ती यांच्याकडे मॅक्नेली भारत इंजिनिअरिंग कंपनी लिमी. या कंपनीस माहे सप्टेंबर व ऑक्टोंबर २०१६ मध्ये दिलेल्या अन्वेषण भेटीच्या संबधाने त्यांच्या शासकीय पदाचे काम पार पाडत असताना कंपनीवर अवकृपा दाखविण्यापासून परावृत्त होण्यासाठी, कायदेशिर पारिश्रमीकाखेरीज श्री एच.एस.चक्रवती यांच्याकडे डी.व्ही.रेठरेकर यांचे मार्फत रुपये २.०० कोटी लाचेची मागणी केली म्हणून सोपान सुर्यवंशी यांनी कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये, तसेच अशी लाचेची मागणी करण्यासाठी डी.व्ही.रेठरेकर यांनी सोपान सुर्यवंशी यांना प्रोत्साहन देवून, सहाय्य केले व लाचेची रक्कम सोपान सुर्यवंशी यांना अदा न केल्यास कंपनीच्या संचालकांना कार्यालयात बोलावून कारवाई केली जाईल असा इशारा देवून मागणी केलेली लाचेची रक्कम प्राप्त करण्यासाठी श्री.एस.एस.चक्रवर्ती यांना वेळोवेळी फोनकॉल करून पाठपुरावा केल्याने डी.व्ही.रेठरेकर यांनी कलम १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा केला आहे. म्हणून माझी केल्याची सरकार पक्षाच्या वतीने त्यांचेविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझी फिर्याद संगणकावर टंकलिखीत करण्यात आली असून ती मी वाचून पाहीली ती बरोबर आहे.

समक्ष
(उमेश गौड)
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि. मुंबई

30/5/2018
ज्ञानेश्वर आवारी
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई.

ला.प्र.वि. मुंबई.